महाराष्ट्र शासन

**तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य**

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४५०

ई-मेल – desk2a@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: २अ/एडीएम/ २०२२/३३७ दिनांक : 17 OCT 2022

प्रति,
सर्व प्राचार्य/संचालक,
सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था (औषधनिर्माणशास्त्र संस्थांसह)

विषय : **शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत (CAP)प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत...**

संदर्भ : १)संचालनालयाचे पत्र क्रमांक १०/एडीएम/Intake Approval/२०२२/५७८, दिनांक ११.७.२०२२

२)मा.आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,मुंबई यांचे पत्र क्रमांक तंशिप्र-१२२२/ प्र.क्र.०७/ प्रवेश क्षमता तपासणी/ २०२२/ ११०१, दिनांक ६.७.२०२२

३) मा.आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,मुंबई यांचा दि. २.९.२०२२ रोजीचा ई मेल संदेश

४) मा.आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,मुंबई यांचे पत्र क्रमांक तंशिप्र-१२२२/०६/ केंप्रप्र/ २०२२/ १५३०, दिनांक १९.०९.२०२२

५) मा.आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,मुंबई यांचे पत्र क्रमांक तंशिप्र-१२२२/ ०६/ केंप्रप्र/२०२२/१६१०,दिनांक ४.१०.२०२२

वरील विषयाबाबत संदर्भाधीन क्रमांक १ च्या पत्रान्वये व्यावसायिक तांत्रिक पदवी , पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी संस्थेबाबत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता संबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार संबंधित विद्यापीठांकडून संलग्नता / समकक्षता प्रदान केल्याची माहिती अद्ययावत करुन दिनांक २३ जुलै २०२२ रोजीपर्यंत ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यास कळविले होते. मात्र शिखर परिषदेची मान्यता,शासन मान्यता, विद्यापीठांचे संलग्नीकरण नसल्यामुळे सदर माहिती अद्ययावत न करता आल्यामुळे संस्थांच्या मागणीवरुन सदर माहिती सादर करण्यासाठी दिनांक ३१.८.२०२२ रोजीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. तसेच राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,मुंबई यांच्या संदर्भीय ई मेल द्वारे कळविल्यानुसार संस्थांना दिनांक ३.९.२०२२ पर्यंत आणि क्रमांक ४ च्या पत्रान्वये कळविल्यानुसार दिनांक २७.९.२०२२ पर्यंत माहिती अद्ययावत करण्यास मुदत दिली होती.

त्यानंतर सहसंचालक कार्यालयांतर्फे माहिती अद्ययावत करण्यात आल्यानंतर संकेतस्थळावरील संबंधित लिंक बंद करण्यात आली होती. या अनुषंगाने राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,मुंबई यांच्या संदर्भाधीन दिनांक ४.१०.२०२२ रोजीच्या पत्रान्वये संस्थांना शेवटची संधी म्हणून दिनांक १७.१०.२०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत माहिती अद्ययावत करण्यासाठी मुदत देण्यात येत आहे. माहिती अद्ययावत करताना ती अचुक

असेल याची विशेष दक्षता घेण्यात यावी. मंजूर प्रवेश क्षमतेची माहिती ही प्रवेश प्रक्रियेदरम्यान जागावाटपात दर्शविण्यात येणार असल्याने सदर माहितीत कोणतीही चुक झाल्यास व पर्यायाने प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचण उद्भवल्यास त्यास सर्वस्वी संबंधित संस्थेचे प्राचार्य/संचालक जबाबदार राहतील.

उपरोक्त मुदतीत संस्थांनी माहिती अद्ययावत न केल्यास, परिणामस्वरुप संस्थेचा समावेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत न झाल्यास होणा-या परिणामास संबंधित संस्था सर्वस्वी जबाबदार असेल या बाबीची गांभीर्याने नोंद घ्यावी.

(प्रमोद नाईक)
सहसंचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

**पृष्ठांकण पत्र जा.क्र.:विकाऔ/शिक्षण/२०२२/ ३७४०**
**दिनांक :-** 10 OCT 2022

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानीत
पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभियांत्रिकी.
सर्व व्यावसायिक तांत्रिक अभ्यासक्रमांच्या संस्था, (औरंगाबाद विभाग)

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणे बाबत.**

सोबतच्या पत्राच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी आपल्या संस्थेची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणे बाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत सदर पत्राचे अवलोकन करुन कार्यवाही करण्यात यावी. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद